# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १४/०१/२०२४ चे ००.०१ ते १६.०० वा.

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खोलापुरी गेट अप.क्र. 15/2024 कलम 461, 380 भादवि | जवाहर गेटच्या आत उपाध्याय ड्रायफ्रुड्स अमरावती | दि. 13/01/24 चे 22.30 ते 14/01/24 चे 10.30 वा दरम्याण दाखल दि. 14/01/24 चे 14.56 | फिर्यादी - रामेश्वर देविलाल उपाध्याय वय - 50 वर्ष रा. लखारा गल्ली जवाहर गेटच्या आत अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि. 14/01/2024 चे सकाळी 10.30 वा. दरम्याण माझा मुलगा भरत रामेश्वर उपाध्याय वय 26 वर्ष हा दुकान उघडायला गेला तर माझे दुकान समोरून बरोबर व्यवस्थित होते. दुकान उघडुन आता प्रवेश केला तर दुकानातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले व पैशाचे काउंटर उघडे दिसले. वर जावुन पाहीले तर तेथील सामान सुद्दा अस्ताव्यस्थ पडलेले दिसले व तिस-या माळ्यावर जावुन पाहीले तर दरवाजाचा कडीकोंडा तुटलेला व खिडकीचा ग्रील तुटलेली व खाली पडलेली दिसली. वरून माझ्या मुलाने मला फोन करून माहीती दिली. तर मी ताबडतोब दुकानात आलो. मला सर्व मुलाने सांगितल्या प्रमाणे दिसले. दुकानात पाहणी केली असता गल्यातील 35000/- रूपये नगदी व चिल्लर व उर्वरीत सीसीटीव्हीचे व DV R वगैर 3000/- रूपयाचा माल, असा एकुन 38000/- रूपयाचा माल चोरीस गेल्याचे दिसले कोणीतरी अज्ञात चोराने रात्रीचे वेळी माझ्या दुकानाचे वरच्या माळ्यावरून खिडकीची ग्रील तोडुन व दुकानाच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडुन दुकानाच्या आत प्रवेश करून दुकानातील 38000/- रूपयाचा माल चोरून नेला आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पो स्टे बडनेरा अप क्र १७/२०२४ कलम ३७९ भादवी | राहते घरासमोरुन श्रीनाथ रेसीडंन्सी, वडुरा, बडनेरा | दि.११/०१/२०२४ रोजी २०.०० वा ते दि.१२/०१/२०२४ चे सकाळी ०५/३० वा दरम्यान | अजय उर्फ जयकुमार मधुकर वैदय वय-४८वर्ष धंदा- प्रायवेट नोकरी फिनकेअर बँक कॉटन मार्केट रा- श्रीनाथ रेसीडन्सी, वडुरा बडनेरा | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फि ची गाडी जुनी वापरती बजाज पॅटीना काळया रंगाची मो सा.क्र.एम एच ३१ सी जे ८१०१ चेचीस क्र एम डी २ डीडी डी झेड झेड झेड पी डब्लुई२३२८२, इंजीन क्र डीयुएम बी पी ई८९७६८ कि.अ.१०,०००/-रु फि च्या मुलाने टयुशनला दि.११/०१/२०२४ रोजी सकाळी ०८/०० वा घेवुन गेला व दुपारी ०४/०० वा आणुन घरासमोर उभी केली. फि हे डयुटीवरुन रात्री ०८/०० वा आले असता गाडी तेथे उभी होती. त्यांनतर रात्री सर्वजण जेवणकरुन झोपले व सकाळी दि.१२/०१/२४ रोजी सकाळी ०५/३० वा उठुन पाहीले तर गाडी घरासमोर नव्हती तिचा आजपावेता शोध घेतला मिळुन आली नाही.अश फि च्य जबान रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ३५/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | प्लॉट नं. ०४ गजानन नगर मेहरबाबा कॉलनी छत्री तलाव रोड अमरावती शहर | घटना ता.वेळ व ठिकाण - दि. १२/०१/२०२४ रोजी १८/०० वा. ते दि. १३/०१/२०२४ चे १०.०० वा. दरम्यान दाखल ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ चे ०१.०८ वा. | अमरा सागर अशोकराव शाहाकार वय ४० वर्ष व्यवसाय - ॲडव्होकेट रा. प्लॉट नं. ०४ गजानन नगर मेहरबाबा कॉलनी छत्री तलाव रोड अमरावती शहर | अज्ञात इसम | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे दि. ०५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पुणे येथे परिवारासह लहाण भाउ आकाश यांचे कडे गेलो होतो आज दि. १३/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मला माझे चुलत भाउ अक्षय शाहाकार यांचा फोन आला की, तुझे घर काल दि. १२/०१/२०२४ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता बंद असल्याचे मी पाहीले परंतु आता तुझे घर उघडे असुन दावाजाच्या कडी तोडलेली आहे व पोलीसांना सांगितले. त्यावरुन मी तात्काळ पुणे येथुन परिवारासह निघुन रात्री ९.३० वा. पोहचलो असता मी पोलीसा समक्ष घराची पाहणी केली असता घराचे मुख्य दरवाजा कोंढा तोडलेला दिसला. तसेच आतमधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. घराच्या वरच्या मजल्यातील रुममधील कपाटाचा दरवाजा तोडुन त्यामधील सामान बाहेर टाकेलेले होते. कपाटमध्ये पाहणी केली असता त्यामध्ये ठेवलेले १. सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे वजन १७.०० ग्रॅम, अंदाजे किंमत ७०,००० रुपये २.सोन्याचे कानातील गोल्ड लटकन वजन ०४.०० ग्रॅम अंदाजे किंमत २४००० रुपये ३. सोन्याची गळयातील चेन वजन १० ग्रॅम ५०००० रुपये ४. सोन्याचे नथ वजन ००.९०० ग्रॅम अंदाजे किंमत २००० रुपये ५. सोन्याचे मनी वजन अर्धा ग्रॅम अं.किं. २००० रुपये ६. चांदीच्या वाटया ०२ नग वजन गॅम माहित नाही अं.किं. ६००० रुपये ७. चांदीचे पैजन वजन २० ग्रॅम अं.किं. ८००० रुपये , चांदीचे जोडवे वजन ५ ग्रॅम अं.किं. ५००० रुपये असे एकुण अं.किं. १,६४,००० रुपये चा माल अज्ञात इसमाने चोरुन नेला करीता रिपोर्ट देत आहे. अशा फर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |